PDFaid.com
#1 pdf solutions

हकीम समिती अहवाल २०१२
ऑटोरिक्षा/टॅक्सी भाडेदर सूत्र विहित करण्यांबाबत

# महाराष्ट्र शासन
## गृह (परिवहन)विभाग

शासन निर्णय क्रमांक एमव्हीआर-०७१२/प्र.क्र.४०(१)परि-२
जागतीक व्यापार केंद्र, ३० वा मजला, कफ परेड, मुंबई ४०० ००५
दिनांक २८ सप्टेंबर, २०१२

वाचा : शासन निर्णय, गृह विभाग, क्रमांक :- एमव्हीआर-११११/प्र.क्र.९६६/परि-२, दि.१३.४.२०१२

**शासन निर्णय** :-राज्यातील ऑटोरिक्षांचे/टॅक्सींचे भाडेदर सूत्र विहित करण्याकरीता केंद्र शासनाचे सेवानिवृत्त सचिव श्री.पी.एम.ए. हकीम यांचे अध्यक्षतेखाली उपरोक्त शासन निर्णय, गृह विभाग, दिनांक १३.४.२०१२ अन्वये एक सदस्यीय समितीचे गठन करण्यात आले.

२. समितीने सर्व संबंधित घटकांशी (Stake Holder) चर्चा करुन अहवाल शासनास सादर केला. सदर अहवाल मोटार वाहन विभागाच्या www.mahatranscom.in या संकेत स्थळावर जनतेच्या माहितीसाठी देखिल प्रसिध्द करण्यात आला.

३. विविध ऑटोरिक्षा/टॅक्सी संघटनांचे पदाधिकारी आणि ग्राहक पंचायतीचे पदाधिकारी यांच्याशी चर्चा करुन सदर अहवालातील शिफारशींबाबत त्यांचे मते जाणून घेण्यांत आली. तसेच अहवालातील शिफारशींबाबत परिवहन आयुक्त यांचे अभिप्रायही घेण्यात आले.

४. समितीने केलेल्या शिफारशी, संबंधितांनी उपस्थित केलेले मुददे व परिवहन आयुक्तांचे अभिप्राय विचारात घेऊन शासन याद्वारे राज्यातील ऑटोरिक्षांचे/टॅक्सींचे भाडेदर सूत्र विहित करण्याकरीता हकीम समितीने सादर केलेल्या अहवालास ऑटोरिक्षाबाबत सोबतच्या विवरण पत्र-१ मध्ये आणि टॅक्सीबाबत सोबतच्या विवरणपत्र-२ मध्ये दर्शविल्यानुसार स्विकृती देत आहे.

५. राज्यातील सर्व प्रादेशिक परिवहन प्राधिकरणांनी सोबतच्या विवरणपत्रातील निर्णयानुसार पुढील कार्यवाही करावी.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यांत आला असून सांकेतांक २०१२०९२८१०५२२८०२०० असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( भि. रा. वाढवे )
शासनाचे सह सचिव

प्रत :-

मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
मा.उप मुख्यमंत्री यांचे सचिव
मा.राज्यमंत्री (परिवहन) यांचे खाजगी सचिव
मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांचे वरिष्ठ स्वीय सहायक
अपर मुख्य सचिव (गृह) यांचे स्वीय सहायक
प्रधान सचिव (परिवहन) यांचे स्वीय सहायक
प्रधान सचिव (विशेष) गृह विभाग यांचे स्वीय सहायक
परिवहन आयुक्त, महाराष्ट राज्य, मुंबई
सर्व जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष संबंधित प्रादेशिक परिवहन प्राधिकरण
सर्व प्रादेशिक परिवहन अधिकारी/सर्व उप प्रादेशिक परिवहन अधिकारी
निवडनस्ती / परि-२